**प्रेसनोट दि.२९/०६/२०१९**

**भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन तसेच आनंदवन व्यसन मुक्ती केंद्र पुणे यांचे वतीने जागतीक व्यसन मुक्ती दिनाचे आयोजन.**

दिनांक २६/६/२०१९ रोजी दुपारी १३/०० ते १४/३० वा.चे दरम्यान अभिनव एज्युकेशन सोसायटीचे अभिनव इंग्लीश मिडीयम ज्युनीअर कॉलेज येथे जागतीक अंमली पदार्थ विरोधी दिनानिमीत्त आनंदवन व्यसनमुक्ती केंद्र खराडी, चंदननगर पुणे व भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने कॉलेज मधील तरूणांना व्यसनाधिनतेपासुन दुर राहणेसाठी जन जागृती कार्यक्रम आयोजीत करण्यात आला होता.

सदर कार्यक्रमाला आनंदवन संस्थेचे श्री हर्षल पंडीत, भारती विद्यापीठ पो स्टे कडील सपोनि श्री चिवडशेट्टी, अभिनव संस्थेचे सेक्रेटरी श्री निर्मुही जगताप, सांस्कृतीक विभागाचे श्री विनोदकुमार बंगाळे, व सुमारे २०० ते २५० विद्यार्थी/विद्यार्थीनी उपस्थित होते. उपस्थीत विद्यार्थ्यांना व्यसनाचे दुष्परीणाम याबाबत सुमारे ३५ मिनीटांचा लघुपट दाखविण्यात आला. त्यानंतर श्री हर्षल पंडीत व सपोनि श्री चिवडशेट्टी यांनी व्यसनापासुन दुर रहाणेचे अवाहन करून त्याबाबत मार्गदर्शन कले. कार्यक्रमाचे शेवटी सर्वांनी व्यसनाबाबत दुर रहाण्याबाबत शपथ घेतली व वंदेमातरम ने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

सदर कार्यक्रमाचे आयोजन केलेमुळे अभिनव शाळेचे संचालक मंडळांनी समाधान व्यक्त केले आहे.

**वरिष्ठ पोलीस निरीक्षक,**
**भारती विदयापीठ पोलीस ठाणे पुणे**